महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संवसु मंडळ कार्यालय, बुलढाणा अंतर्गत सन 2025-26 करीता एकुण 168 पदे भरण्याकरिता पात्र शिकाऊ उमेदवारांची निवड समितीद्वारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र शिकाऊ उमेदवारांनी दि. 15.01.2025 पासून ते दि. 27.01.2025 ला सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावा. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्यामुळे गुणवत्ताधारक (Merit List नुसार) शिकाऊ उमेदवारांचे निवडीबाबतची सुचना उमेदवाराचे नोंदणीकृत मोबाईल क्र. व ईमेल आयडी (E-mail) वर पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असल्याने उमेदवारांनी या कार्यालयात येण्याची गरज नाही. निवड झालेल्या उमेदवारांना नोंदणीकृत Email id वर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | विभागाचे नाव | आस्थापना नोंदणी क्रमांक | वीजतंत्री | तारतंत्री | कोपा | संबंधित आस्थापनाचे भ्रमणध्वनि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बुलढाणा मंडळ | E11162701135 | 0 | 0 | 2 | 7391068617 |
| 2 | बुलढाणा विभाग | E05202702091 | 18 | 18 | 4 | 9975889963 |
| 3 | खामगाव विभाग | E11162701574 | 16 | 17 | 4 | 7391068617 |
| 4 | मलकापूर विभाग | E04212700178 | 20 | 20 | 5 | 7875346737 |
| 5 | मेहकर विभाग | E01252700057 | 20 | 20 | 4 | 9767923738 |

**अटी व शर्ती -** १) शिकाऊ उमेदवारांचे वय किमान 18 वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. दि. 01.01.2025 पर्यंत 18 ते 30 वर्ष व मागासवर्गीयांसाठी 5 वर्ष शिथील राहील. २) सदर उमेदवार हा बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी असावा. ३) **शैक्षणिक पात्रता :** अ) महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त (10+2) व बुलढाणा जिल्ह्यातील शासनमान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन (कोपा, वीजतंत्री व तारतंत्री व्यवसाय) मागास प्रवर्गातील (अ.ज. व अ.जा. करिता) उमेदवारांकरिता 55% गुण व उर्वरित प्रवर्गाकरिता किमान 60% गुण मिळवुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ४) मागासवर्गीय उमेदवारांची निवड भारतीय शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार करण्यात येईल त्याकरिता उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. ५) उमेदवाराने **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. ६) कोपा, वीजतंत्री व तारतंत्री या संवर्गाचा प्रशिक्षण कालावधी एक वर्षाकरिता राहिल. ७) प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना शासकीय नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. ८) उमेदवारांची Profile परिपुर्ण असणे आवश्यक आहे तसेच आधारकार्ड व Profile वरील माहिती सारखी असावी. अपूर्ण Profile असणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. ९) शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती करिता 1:10 व अनुसूचित जमाती करिता 1:11 प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरीता पदे राखीव राहील. १०) निवड झालेल्या पात्र उमेदवाराने सोबत येतांना आपली सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची साक्षांकित दोन छायाप्रती सोबत आणावी. ११) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. १२) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

PRO No. :- 01/Dt.10.01.2025.

**सक्षम अधिकाऱ्यांचे नाव व कार्यालयाचे नाव पत्ता आदी तपशील पुढीलप्रमाणे :-**

१) अधिक्षक अभियंता, महावितरण मंडळ कार्यालय, विद्युत भवन, चिखली रोड, बुलढाणा २) कार्यकारी अभियंता, महावितरण संवसु विभाग कार्यालय, विद्युत भवन, चिखली रोड, बुलढाणा ३) कार्यकारी अभियंता, महावितरण संवसु विभाग कार्यालय, नॅशनल हायस्कुलच्या बाजुला, खामगाव ४) कार्यकारी अभियंता, महावितरण संवसु विभाग कार्यालय, 33/11 केव्ही उपकेंद्र बिर्ला रोड, मलकापूर ५) कार्यकारी अभियंता, महावितरण संवसु विभाग कार्यालय, जुने बस स्टॅण्ड, लोणार वेस, मेहकर.

**अधिक्षक अभियंता, संवसु मंडळ,**
**महावितरण बुलढाणा**

nmk.co.in